Impact Factor 2.147

ISSN 2349-638x

Refereed And Indexed Journal

AAYUSHI INTERNATIONAL INTERDISCIPLINARY RESEARCH JOURNAL (AIIRJ)

Monthly Publish Journal

VOL-III ISSUE-IX Sept. 2016

Address
•Vikram Nagar, Boudhi Chouk, Latur.
•Tq. Latur, Dis. Latur 413512
•(+91) 9922455749, (+91) 9158387437

Email
•aiirjpramod@gmail.com

Website
•www.aiirjournal.com

CHIEF EDITOR – PRAMOD PRAKASHRAO TANDALE

नारायण सुर्वे यांच्या कवितेतील वाङ्मयीन विशेष

डॉ. बालाजी विठ्ठलराव डिगोळे
मराठी विभागप्रमुख,
शिवजागृती महाविद्यालय, नळेगाव
जि. लातूर.

नारायण सुर्वे यांच्या कवितेचे महत्वाचे वैशिष्ट्ये म्हणजे ही कविता प्रामुख्याने कथात्मक रुप धारण करते. सुर्वे आपल्या कवितेमधून कामगारांच्या जीवनाची अनेक दु:खाने भरलेली कथाच सांगतात. अनेक घटना प्रसंग वर्णन करुन ही कथा आपल्यासमोर उभी करतात तेंव्हा सुर्वे कामगारांच्या जीवनातील कथा सांगत नाहीत तेंव्हा ते आपल्या जीवन अनुभवांना कथेच्या रुपातच व्यक्त करतात. थोडक्यात प्रत्येक कवितेमधून सुर्वे कशाचे तरी कथन, निवेदन किंवा वर्णन करीत असलेले दिसतात. म्हणूनच सुर्वेची कविता निवेदनाचे, कथनाचे, काही तरी सांगण्याचे, संपादाचे रुप धारण करते. आपल्याला त्यांच्या कवितेमध्ये कथन हे वैशिष्ट्य सापडते. सुर्वेच्या कवितेतील सगळया व्यक्तीरेखा त्यांच्या अनुभवाचे जीवनातील खाचा खळग्यांचे आपल्यासमोर कथन करतात म्हणूनच सुर्वेची कविता ही कथात्मक, कविता आहे. असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

या दृष्टीने 'माझी आई', 'विश्वास ठेव', 'कर्जपुत्र' 'असा कसा दगड झालों, 'सत्य', 'गलबलून जातो तेंव्हा', अशा प्रकारच्या किती तरी कविता या संदर्भात दाखवून देता येतील या कविता म्हणजे कामगारांच्या संपुर्ण जीवनाच्या दु:खाने भरलेल्या कथाच आहेत. ''माझे विद्यापीठ'' ही कविता तर सुर्वे यांच्या संपुर्ण जीवन अनुभवाची प्रदीर्घ अशी एक कथाच आहे असे आपल्याला दिसते. सकाळी लगबगीने पाय टाकीत कारखान्याच्या दिशेने जाणारे कामगारांचे लोंढे यामध्येच झपाझपा पाय उचलीत जाणारी, मुलांची समजूत घालणारी, दीवसभर काम करणारी अशी आई एकदम मृत्यूमूखी कशी पडते याची करुण अशी कथा 'माझी आई' या कवितेमध्ये सुर्वेनी सांगितलेली आहे. या कथा कवितेच्या शेवट.

''आधीचे नव्हतेच काही''
''आता आईदेखील नाही''
''अश्रूंना घालीत अडसर''
''जागत होतो रात्रभर''

अशा प्रकारच्या पोरक्या मुलांचे दु:ख वाचकांना अंतरमुख करते आणि ही कविता एक कथाच सांगून जाते. अशाच प्रकारे जीवनातील वास्तव भीषण विदारक असे दर्शन 'सत्य' या कवितेमध्ये सांगून कामगारांच्या जीवनातील शृंगाराची करुण कहाणी सुर्वे यांनी सांगितलेली आहे. जीवनातील अतिशय आनंदाचे, मीलनाचे, प्रेमाचे क्षणही कामगारांना भोगता येत नाही याची करुण कहाणी तीन प्रसंगातून सुर्वे यांनी या कवितेत सांगितलेली आहे या कवितेत केवळ प्रेम जीवनाचे, चित्रणच नाही तर मुंबईतील झ ोपडपट्टी मधील एकत्रित राहणाऱ्या कोंबड्याच्या खुराड्यासारखे वातावरण असणाऱ्या माणसांच्या कुटूंबाची ही करुण कहाणी आहे. घरात सून आल्या दीवशी म्हातारी मुलांसह कोनाडा जवळ करते. बाप फुटपाथवर जातो. दुसऱ्या प्रसंगात याच झोपडीत मुल जन्माला येते. थोडेसे आनंदाचे वातावरण निर्माण होते. कौतूकही होते परंतु हा आनंद दारिद्र्यात केंव्हाच लोपून जातो. तिसऱ्या प्रसंगी नायक-नायिका एकत्रित येतात तेंव्हा

याच वेळेला चार-पाच मुले नायिकेजवळ असतात. कोनाड्यातील म्हातारी भाकरीसाठी तडफडते आणि उद्‌गारते.

''नारायणा''
''उद्यापासून तिलाही काम बघ बाबा''

अशा प्रकारे भूक आणि भाकरी यांच्याच गरजेत सगळे आयुष्य, सगळे तारुण्य, खर्ची घालावे लागते असे ही विदारक सत्यकहाणी या कवितेमध्ये सुर्वे आपल्याला सांगतात.

वरील कवितेप्रमाणेच 'विश्वास ठेव' या कवितेमध्येही कामगारांच्या एका जोडप्याची कहानीच आलेली आहे. बायकोचा विश्वास संपादन करण्याचा प्रयत्न कवितेतील नायक करतो. आपण वाईट आहोत असे प्रेयसीला जे वाटते त्यातून मार्ग काढण्याचा प्रयत्न हा नायक करतो. अतीशय नम्र शब्दात तो म्हणतो.

''इतका वाईट नाही मी''
''जितका तू आज समजतेस''

हे पटवून सांगण्यासाठी नायक आपल्या जीवनातील अनेक घटना प्रसंगाची आठवण आपल्या नायिकेला करुन देताना म्हणतो.

''कसे जगलो आपण, किती सांगू, किती करुन देऊ याद''
''पळे युगासम भासली, नाही बोलवत, नको ती मोजदाद''

अशाप्रकारे अतिशय संयमाने सामंजसपणाने आपल्या बायकोला मैत्रीणीसारखे समजून तिचा विश्वास संपादण्याचा प्रयत्न करतो अशा प्रकारे ही कविता एक कुटुंब कथाच आहे.

''असा कसा दगड झालो'' या कवितेतूनही एक पश्चातापाचा प्रसंग सुर्वे सांगतात. नेहमी आपल्या प्रेयसीबरोबर प्रेमाने वागणारा, तिची काळजी वाहणारा, तिच्या प्रेमाच्या छायेत फुलणारा, तिचा विश्वास संपादन करु पाहणारा आणि आपल्या मुलांना काळे गुलाब समजणारा नायक संतापाच्या आहारी जाऊन मुलांना मारतो. केवीलवाण्या अवस्थेत मुले याचना करतात. तरीही हा त्यांना तडाखे देतच राहतो अशावेळी त्याची नायिका एकदम संतापते आणि अतीशय तीव्र शब्दात त्याला म्हणते.

''पोरं पोसता येत नाहीत तर बाप कशाला झालात?''

या वाक्याने नायकाला स्वतःची चूक समजून येते. आपल्या कृत्याचा त्याला संताप येतो आणि या संतापातूनच तो उद्‌गारतो असा कसा दगड झालो.

''दगडच झालो''

सुर्वे यांच्या अशा किती तरी कविता आपल्याला काढून दाखवता येतील. या एका-एका कवितेतून एखाद्या प्रसंगाचे, एखाद्या घटनेची, एखाद्या माणसाच्या जीवनाची, एक कथाच सांगून जाते. 'कर्जपुत्र' ही कविता ही दारिद्रयामध्ये कामगारांच्या घरातील एका तरुणाच्या लग्नप्रसंगीची कथा आहे. आपली कथा सांगताना दारिद्रयाचे, कर्जाचे वर्णन करतांना तो म्हणतो.

....''पुढे काढले लगीन अमुचे बापानेच''
''ताशे वाजंसी वाजली मिरवलो कर्जातच''

अशाप्रकारे लग्नापासूनच कर्जाची सुरुवात होते. जीवन कर्जातच जाते आणि जीवनाचा शेवटही कर्जातच होतो असी ही कर्जपुत्राची करुण कहाणी आहे. कोणी भुमीपुत्र म्हणून होतो, कोणी राजपुत्र म्हणवून होतो परंतु कामगारांच्या वाट्याला मात्र कर्जपुत्र हीच पदवी मिळते आणि जीवनाचा अंत कर्जातच कसा होतो हे सांगताना हा कर्जपुत्र म्हणतो.

''एका पुण्यरात्री आलो एका बेडक्यात मेलो''
''वर्गणीच्या वाटीवरच गुंडाळून गेलो.''

अशी ही दारिद्र्यात, कर्जात जन्मणाऱ्या, संसार करणाऱ्या आणि त्यातच मरणा-या माणसांची करुण कहाणी आहे. या गोष्टीनेच कीती तरी व्यक्तींच्या कहाण्या मुळातूनच पाहण्यासारख्या आहेत. 'वेश्येची कथा' ही अशीच एक दु:खाची कथा आहे 'शीगवाला' असणाऱ्या माणसाची माणूसकी एका संपूर्ण कथेतूनच सुर्वे यांनी सांगितलेली आहे. हा खाटीक सुर्वेच्या आईला मुसलमानांच्या तावडीतून वाचवितो आणि स्वत:चा पाय गमावून बसतो. म्हणजेच हा खाटीक म्हणून हिंदू द्वेश करतात आणि हिंदूच्या स्त्रीला संरक्षण देतो म्हणून मुस्लीम पाय मोडतात अशी ही अमानुष्य जातीय वृत्ती आणि खाटकाची माणूसकी या दोन्हींची अतीशय विदारक अशी कथा आहे. हा खाटीक आपले अनुभव सांगताना विलक्षण महत्वाची गोष्ट सांगून जातो तो म्हणतो.

''एक ध्यानमदी ठेव बेटा !''
''सबद लिखना बडा सोपा है.''
'शब्दासाठी जीना मुश्कील है'

असा मौलीक विचार सांगता सांगताच पुढे जाऊन हा दाऊद चाचाच म्हणतो.

''आता आदमी झाला सस्ता - बकरा म्हाग झाला''
''जिंदगीमध्ये पोरा-पुरा अंधेरा आला.''

अशाप्रकारे ही कविता म्हणजे दाऊद चाचा आणि जातीवादी हिंदू-मुस्लीम यांच्या प्रवृत्तीची एक जीवंत कथाच आहे.

2) <u>संवादात्मकता</u> :-

सुर्वे यांच्या कवितेमध्ये कामगारांच्या जीवनाची कथा सांगीतलेली असते. ही कथा काहीवेळेला निवेदनातून एखाद्याच्या घटनेच्या वर्णनातून सुर्वे सांगतात. निवेदनाच्या, कथनाच्या जोडीला मधूर मधूर संवादही आलेले दिसतात. म्हणजेच सुर्वे यांच्या कवितेतील प्रत्यक्ष व्यक्तीच बोलू लागतात अशा प्रकारचे संवाद आल्यामुळे त्या व्यक्तीचे संपुर्ण भावविश्वच आपल्यासमोर उभे राहते. सुर्वे यांची कविता ही कामगारांच्या समुहाची कविता आहे या समुहामध्ये अनेकजन एकमेकांशी संवाद करतात. कधी-कधी स्वत: सुर्वेही यांच्याशी संवाद करतात. म्हणूनच या कवितेमध्ये संवादाचे प्रमाण जास्त आहे. यादृष्टीने 'संवाद' ही कविता मुद्दाम लक्षात घेण्यासारखी आहे. या कवितेमध्ये आपल्या मीत्रांच्या समुहाला उद्देशून आतील नायक म्हणतो.

''कबूल !.....''
''आजच्या इतके आयुष्य कठोर नव्हते''
''नव्हतो आजच्या इतके उदास''

''इतका नव्हता अविश्वास....''

असा हा कामगारांचा एकमेकासी संवाद होतो. 'पोस्टर' ही कविता तर संपूर्ण संवादानेच भरलेली आहे हणम्या, शिंदे, इसल्या या तिघांच्या संवादातून निर्माण होणारे नाट्य या कवितून व्यक्त होते कवितेची सुरवातच.

''हणम्या रे ही शिडी घे''
''मी खळ लावतो''
''त्या खिडकीपाशी नकोरे हळवू''
''कायकु रे''
''उसकी मैना रहती है ना उधर''

अशा प्रकारचे एकामागून एक संवाद या कवितेत येतात. यामधूनच वेगवेगळया भाषेतील संमीश्र संवाद या कवितेतून आपल्याला पाहावयाला मिळतात 'मुंबई' या कवितेमध्ये नायक कामगारांना उद्देशुन त्यांचा गौरव करतांना म्हणतो.

''मित्र हो ! तुम्हीच मुंबईच्या घडणीतील अमृत अक्षर''

याच कवितेत नायकाची छोटी मुले रसत्याने जाता जाता विचारतात.

''बाबा - घ्या दगडाच्या भिंती पोलीस इथे पहारे का हो देतात ?''

अशा प्रकारचे मुलगा आणि बाप यांचे संवाद आलेले आहेत 'असा कसा दगड झालो' यामध्येही पती आणि पत्नी यांचे संवाद आलेले आहेत 'नेहरु गेले त्या वेळची गोष्ट' या कवितेत वेश्येचा आणि हातगाडीवाल्याचा संवाद या माणसांच्या जीवनावर भेदक प्रकाश टाकतो 'सत्य' या कवितेतील नायकाच्या आईचे कळवळून बोललेले शब्द जीवनातील भेदक सत्य दाखवून जातात. यादृष्टीने पुढील संवाद लक्षात घेण्यासारखे आहेत.

''कोनाडा हळहळला - कळवळला''
''नारायणा''
''शिंक्यावरची भाकर घे - पुट पुट ला''

अशा प्रकारचे कामगारांचे जीवनदर्शन घडविणारे कितीतरी संवाद या कवितासंग्रहातून आपल्याला काढून दाखवता येतील. जातीयवादाचे विष कसे जीवन उध्वस्त करते याचे दर्शन 'शीगवाला' या कवितेतील दाऊद चाचा आणि कवि यांच्या संवादातून लक्षात येते ही संपुर्ण कविता एखाद्या नाटकातील संवादाप्रमाणे भरलेली आहे कविता संवादानेच सुरु होते.

''क्या लिखतो रे पोरा...''
''नाही चाचा - काही हरक जुळवतो.''

संपुर्ण कवितेतील संवाद यादृष्टीने लक्षात घेण्यासारखा आहे. थोडक्यात नारायण सुर्वे यांची कविता ही संवादाने भरलेली कविता आहे. हे संवाद कामगार विश्वातील दु:ख, दैन्य याचप्रमाणे कामगार विश्वातील आशावाद, जीद्द या गोष्टी ही स्वत: सुर्वे स्वत:शीच संवाद करतात म्हणतात.

''हे नारायणा''
''अशा नंग्यांच्या दुनियेत चालायची वाट, लक्षात ठेव सगळया खाणाखुणा''

या सर्व जीवनातील खाच, खळगे, खाणाखुणा, अन्याय, अत्याचार, कामगारांचे शोषण हे सगळे लक्षात ठेवून त्यांची व्यथा शब्दांमध्ये आणण्याची हमी या कामगाराला देतांना सुर्वे म्हणतात.

''बापहो ''
''तुमच्या व्यथांना शब्दात''
''अमर कोणी केले असते''

अशाप्रकारे सुर्वे कामगारांशीही संवाद साधतात. सुर्वेंची कविता एकट्यांने अवतरत नाही ही कविता एकट्याचीच नाही आणि एकट्यासाठीही नाही तर सगळ्या कामगारांच्यासाठीच हे आहे. सारस्वतांना उद्देशून सुर्वे पुढील संवादात म्हणतात.

''एकटाच आलो नाही''
''युगाचीही साथ आहे''
''सावध असा''
''तुफानाची हीच सुरुवात आहे''

अशा प्रकारे सुर्वे यांच्या कवितेचा जन्मच मुळी कामगारांशी संवाद करतांना होतो किंवा कामगारांच्या वतीने दुसऱ्याशी संवाद करताना होतो. म्हणूनच संवाद हा सुर्वेंच्या कवितेचा महत्वाचा विशेष आहे.

3.सुर्वे यांची कविता जीवनापासून दूर जात नाही :-

नारायण सुर्वेंची कविता ही कामगारांच्या, शोषीताच्या मुंबईतील रस्त्यावर राहणाऱ्या माणसांच्या दु:खाची कविता आहे. या माणसाच्या जीवनात येणारी संकटे, होणारे अपमान, भोगाव्या लागणाऱ्या वेदना या सर्वाचे जीवघेणे वर्णन असले तरीही माणसे जीवनातून पळून जात नाहीत. काहीवेळेला ही माणसे निराश होतात, गांगरून जातात, असह्य होऊन जातात परंतु जीवन जगण्यासाठी पुन्हा तयार होतात. पुन्हा संघर्षाला सिध्द होतात. कितीही काळोख असला तरी त्यातून थोडासा प्रकाश निर्माण करण्याचा प्रयत्न करतात या दृष्टीने 'नेहरु गेले त्या वेळची गोष्ट' या कवितेतील हातगाडीवाला आपला छोटासा दीवा सांभाळून नेतो. अशाच प्रकारे सुर्वेंच्या कवितेतील माणसे पुर्णत: निराश होत नाहीत. प्रसंगी गलबलून जातात परंतु अशा गलबलून गेलेल्या, थकून गेलेल्या माणसाला पुन्हा कुणीतरी साथ देते आणि सावरुन धरते म्हणूनच एका कवितेतील निराश झालेल्या आपल्या प्रेयसीला आशावादीपणा जगण्याची जिद्द निर्माण करण्यासाठी धैर्य देणारा प्रियकर म्हणतो.

''याच वस्तीतून आपले सुख येईल''
''तोवर तुला मला जागलेच पाहिजे''

'पोस्टर' या कवितेतील मुले कितीही विवंचना असल्यातरी जगण्याची जिद्द सोडीत नाहीत. इसल्या अतिशय प्रतीकूल स्थितीमध्येही प्रेमाची, इश्काची म्हणजेच जीवन जगण्याची भाषाच बोलतो. त्याचा आशावाद, त्याच्या जीवनाचे सुंदर स्वप्न पुढील ओळीतून लक्षात येते.

"देख रे शिंदे, उपर में चांद का टुकडा
गालीब की गजल सताती है"

'शीगवाला' या कवितेतील खाटीक असलेला दाऊद चाचा एका स्त्रीचा प्राण वाचवण्यासाठी पाय मोडून घेतो, नागवला जातो परंतु आशावाद सोडीत नाही. चांगल्या गोष्टीवर त्याची श्रध्दा आहे. खाटीक असूनही गाभणवाली गाय कापीत नाही. अशाप्रकारे सुर्वेच्या सर्व कवितेतील माणसे वाईट प्रसंगीही आशावादी राहतात. जीवन जगण्यासाठी संघर्ष करतात. इथली स्त्री ही अनेक वेळा थकलेल्या पुरूषाला, निराश झालेल्या पुरूषाला धीर देताना म्हणते,

"असेच एकमेकांना सावरीत जगायचे आहे,
जगात तू थकला असशील तर
माझी देहवात पेटवून ठेव."

अशा प्रकारचे जीवनात समर्थपणे पाय रोवून आशावादीपणाने या कामगारांना भाकरी तर हवीच आहे परंतु भाकरीबरोबर आणखी काही हवे आहे हे आणखी काही म्हणजे माणसाचे स्वत्व, माणसाचा स्वाभिमान, माणसाची संस्कृती आणि माणसाची माणुसकी या गोष्टीमुळेच नारायण सुर्वेच्या कवितेमध्ये एक प्रकारचा आशावाद पहायला मिळतो. म्हणूनच सुर्वे एका कवितेत म्हणतात,

"जगणे कठीण झाले आहे तरी जगायचे आहे
साहण्यासारखे अजून पुष्कळ साहायचे आहे
घडीभर अंधार नंतर पहाटच आहे."

अशा प्रकारे अंधारातून निर्माण होणाऱ्या पहाटेवर, भविष्यकाळावर, मानवी मूल्यांवर सुर्वेच्या कवितेचा विश्वास आहे म्हणूनच ही कविता कितीही दु:खाचे चटके बसले तरी निराश होत नाही तर आशावादीच राहते.

4.नारायण सुर्वे यांच्या कवितेची भाषा :-

सुर्वे यांच्या कवितेची प्रकृती ही कथात्मक आहे, निवेदनात्मक आहे. कामगारांच्या जीवनातील विविध पैलूंच्या, सुख-दु:खांच्या कथा या कवितेतून व्यक्त झालेल्या आहेत. अशा प्रकारच्या या कविता कथात्मक बनलेल्या आहेत. सुर्वेच्या कवितेची अभिव्यक्तीही अशाच प्रकारची साधी, सरळ आणि सुस्पष्ट अशीच आहे. गुंतागुंतीची, क्लीष्ट, दुर्बोध, बोजड, न कळणारी, अनाकलनीय अशी नाही. ज्याप्रमाणे कामगारांचे जीवन सरळ, साधे असते. या माणसांना कसलाच अर्थ नसतो. म्हणूनच ही माणसे आपले दु:ख, आपल्या भावना, आपला राग, द्वेश अगदी सरळ-सरळपणे बोलून दाखवितात. त्यांची भाषा जीवनातून आलेली असते. त्यामुळे सुर्वेच्या कवितेची भाषा ही अशीच सरळ, साधी अशी बनलेली आहे. कामगारांच्या भाषेतूनच सुर्वेची कविता व्यक्त होते. म्हणून आपल्याला ही कविता वाचल्याबरोबर लक्षात येते.

सुर्वे यांच्या कवितेचे वैशिष्ट्य म्हणजे ही कविता कामगरांच्या जीवनातील अनुभव व्यक्त करणारी कविता आहे. या कामगार वर्गात संपूर्ण महाराष्ट्रातून, महाराष्ट्राच्या बाहेरूनही अनेक जाती, धर्माचे, पंथांचे, भाषांचे लोक एकत्रीत आले आहेत आणि म्हणूनच या सगळ्या माणसांच्या एकत्रीत येण्यातून जी मराठी तयार होते, जी मराठी बोलली जाते तीच संमीश्रीत मराठी सुर्वेच्या कवितेची भाषा बनते. म्हणूनच ही भाषा हिंदी, उर्दू मिश्रीत बनलेली दिसते.

सुर्वे यांच्या कवितेची भाषा ही केवळ एका कवीमनाची भाषा नाही तर एका समुहाची भाषा आहे. म्हणूनच आपल्याला ही भाषा कामगारांच्या जीवनातीलच वाटते. समुहांच्या भाषेतूनच ही कविता व्यक्त होते. एक कामगार दुसऱ्याला बोलतो. तसेच तो स्वतःच्या कुटूंबातील व्यक्तींशीही बोलतो. सतत बोलण्यातून काहीतरी व्यक्त करतो. म्हणूनच या भाषेला निवेदनाचे आणि संवादाचे रूप प्राप्त होते. संवादाच्या दृष्टीने 'सत्य', 'असा कसा दगड झालो', 'विश्वास ठेव' या कविता मुद्दाम पाहण्यासारख्या आहेत. तर निवेदनाच्या दृष्टीने 'चार शब्द', 'माझी आई', 'गलबलून जातो तेव्हा', 'आमुची दुनिया', 'माझे विद्यापीठ' या कविता भाषेच्या दृष्टीने लक्षात घेण्यासारख्या आहेत. थोडक्यात आपल्याला असे म्हणता येईल की, सुर्वेच्या कवितेची भाषा ही कामगारांची भाषा आहे. ही संवादात्मक भाषा आहे. याचप्रमाणे ही निवेदनाची भाषा आहे.

5) शब्दांना विशेष महत्त्व :-

सुर्वेच्या भाषेत शब्दांना विशेष महत्व आहे. कामगारांचे जीवन शब्दातूनच व्यक्त होते. हे शब्द दैनंदिन जीवनातील शब्द आहेत. शब्दांवर सुर्वेचे प्रेम आहे. शब्दांचे सामर्थ्य सुर्वेना जाणवते. म्हणूनच 'कवितेवे शब्द' या कवितेत शब्दावरचा विश्वास व्यक्त करतांना सुर्वे म्हणतात,

"इथूनच शब्दांच्या हाती
फुले ठेवित आहे
इथूनच शब्दांच्या हाती
खडगे मी देत आहे."

अशा प्रकारे शब्दांमधून फलांसारख्या नाजूक भावना आपण व्यक्त करतो आणि खडगासारखा प्रकार, तीव्र, भेदक विचारांचा अविष्कारही शब्दातून व्यक्त करू शकतो अशी विश्वासाची भावना सुर्वे व्यक्त करतात.

नारायण सुर्वे यांच्या आपल्या शब्दांवर, आपल्या कवितेवर जसा विश्वास आहे तसाच शब्दांवर धाकही आहे. आपले शब्द, आपली कविता लोकांच्या करमणुकीसाठी, स्तुतीसाठी सुर्वे मुळीच वापरत नाहीत. ही कवितेशी केलेली बेइमानी आहे असे त्यांना वाटते. म्हणून शब्दांवर पकड ठेवतांना त्यांना सावध करताना ते म्हणतात,

"शब्दांनो सावध असा
सक्त पहारे बसलेत"

याहीपुढे जाऊन आपली कवितेवरची श्रद्धा वाईट परिस्थितीतही सुर्वे कमी होऊ देत नाहीत. म्हणून ते म्हणतात,

"झुट बोलून आयुष्य
कुणालाही सजवता येते"

परंतु आपण मात्र अशा शब्दांशी, कामगारांशी अप्रामाणिकपणा केला नाही असेही ते म्हणतात. म्हणूनच सुर्वेची भाषा त्यांच्या कवितेतून व्यक्त होणाऱ्या कामगारांच्या जीवनाशी प्रामाणिक राहिलेली भाषा आहे हे एक सुर्वेच्या कवितेचे, भाषेचे वैशिष्ट्य आहे.

6) नादमयता :-

सुर्वेंच्या कवितेतील भाषेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे त्यांच्या शब्दांची नादमयता हे होय. सुर्वेंचे साधे-साधे शब्द अतिशय जोरकसपणे अनुभवाची तीव्रता घेऊन येतात. आधुनिक कवितेमध्ये अशा आशयाचा जोरकसपणा घेऊन येणारे शब्द इतरांच्या कवितेतून दिसत नाहीत. असे सुर्वेंच्या कवितेसंबंधी, तिच्या भाषेसंबंधी मराठीतील थोर समीक्षक प्राचार्य नरहर कुरंदकर यांनी म्हटलेले आहे.

सुर्वेंच्या कवितेत लयबध्दता होती तशा प्रकारची लयबध्दता इतरांच्या कवितेला दिसत नाही. ही कविता गेय नाही म्हणजेच टाळ्यांच्या कवितेसारखी संगीतबध्द करता येत नाही. तरी परंतु एक प्रकारची लयबध्दता या कवितेच्या भाषेत दिसते.

7) प्रतिमासृष्टी :-

सुर्वे यांच्या कवितेतील प्रतिमासृष्टी ही लक्षात घेण्यासारखी आहे. या कवितेची भावना ही मुंबईतील कामगारांच्या जीवनातील, फुटपाथवरील बेकारांच्या जीवनातील भावना आहे. म्हणूनच यांच्या दैनंदिन जीवनातील शब्दच कवितेत प्रतिमांचे रूप धारण करतात. सगळे भावविश्वाच अशा प्रतिमेतून आपल्यासमोर उभे राहते. काही वेळेला सुर्वे अतिशय तिरप्या उपरोधिक पध्दतीने या प्रतिमा योजतात. या दृष्टीने पुढील प्रतिमा कशा विरोधी भावना व्यक्त करतात ते पाहा.

"ऐसा गा मी ब्रह्म
विश्वाचा आधार
खोलिस लाचार हक्काचिया"
अशीच दुसरी प्रतिमा पाहा.
"निर्मुन धन आम्ही सारं
मालक असून झालो चोर"

ही मुंबईच्या लावणीतील प्रतिमा लक्षात ठेवण्यासारखी आहे. प्रतिमा आपल्या लक्षात राहण्यासारख्या आहेत. "माझी आई" या कवितेतील चादरीची प्रतिमा "शब्दांचे ईश्वर" या कवितेतील चंद्र, सूर्याची प्रतिमा "पहारा" कवितेतील पापण्यांची प्रतिमा, 'सत्य' या कवितेतील कोनाडा हळहळला ही प्रतीमा, 'नेहरू गेले त्या वेळची गोष्ट' या कवितेतील शीड पेलणाऱ्या खाटेची प्रतिमा, 'गाणे' या कवितेतील भरल्या पोटाणे पाहिलेल्या चंद्राची प्रतिमा अशा प्रकारे कितीतरी प्रतीमा कामगारांच्या विश्वाचे दर्शन आपल्याला सहजपणाने परंत तितक्याच उत्कटपणाने सुर्वे घडवित थोडक्यात सुर्वेंच्या कवितेतील निवेदन, भाषा, संवाद आणि प्रतिमा यामधून कवितेतील आशय जिवंतपणाने व्यक्त होतो. भाषा आणि आशय यामध्ये एकजीवता आढळून येते.

संदर्भ सूची :-

1) नारायण सूर्वे, 'सनद', पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती, 1982.
2) भालचंद्र फडके, 'दलित साहित्य : वेदना आणि विद्रोह', श्री विद्या प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती, 1977.
3) योगेंद्र मेश्राम, 'दलित साहित्य : उद्‌गम आणि विकास', विश्वभारती प्रकाशन, नागपूर, प्रथमावृत्ती, 1989.
4) डॉ. संजय मनु, 'शैली दलित कवितेची', गोदा प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 2009.
5) डॉ. बिरा पारसे, 'दलित कवितेतील अस्मिता', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 2008.

6) डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, 'मराठी कविता : आकलन आणि आस्वाद', स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 2004.
7) रा.ग. जाधव, 'कविता आणि रसिकता', परिमल प्रकाशन, औरंगाबाद, एप्रिल 2001.
8) वसंत आबाजी डहाके, 'कवितेविषयी' स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 1999.
9) दिगंबर पाध्ये, 'अवलोकनासाठी समीक्षा आणि साहित्य', लोकवाङ्मयगृह, मुंबई, प्रथमावृत्ती, 2012.
10) डॉ. के.जी. सोनकांबळे, 'मराठी दलित कविता आशय आणि अभिव्यक्ती', कैलाश पब्लिकेशन्स, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 2007.
11) डॉ. पृथ्वीराज तौर (संपा.), 'साहित्य आणि विद्रोह', चन्मय प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती, 2008.

Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com